वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. १०.०० कोटी वरुन २०.०० कोटी पर्यंत वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक-वनाम-१०९४/२०२/प्र.क्र.४४/क्रीडापो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १५ नोव्हेंबर १९९६

वाचा- १] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. व्हीजेडब्ल्यु-१०८३/८५/का-५, दि. १.१०.१९८३ — २ कोटी

२] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक-व्हीजेडब्ल्यू-१०८८/४७७९४/१२२/मावक-२, दिनांक ६.२.१९८९ — ५ कोटी

३] वसंतराव नाईक, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे पत्र क्र. वित्त व लेखा/२४६/६८७/९३, दिनांक १४.१०.१९९३

४] वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अ.शा.प.क्र. विजाभज/विवले/२४६/४८५/९४, दिनांक २५.९.१९९४ चे पत्र.

५] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक-वनाम-१०९४/२०२/प्र.क्र.४४/मावक-६, दि. २८.३.१९९५ — १० कोटी

६] वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाचे पत्र क्र. विजाभज/वित्त-२/८७३/९५, दि. ५/१/९६.

शासन निर्णय :- वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मर्यादित या शासन अंगीकृत उपक्रमांची निर्मिती शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. व्हीजेडब्ल्यू-१०८३/६८३/का-७, दिनांक १.१०.१९८३ अन्वये करण्यात येऊन हे महामंडळ कंपनी कायदा १९६० खाली पंजिबध्द झाले आहे. स्थापनेच्या वेळी या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. २.०० कोटी ठरविण्यांत आले होते. या महामंडळातर्फे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्वांगीण विकासाशाठी राबविण्यांत येणाऱ्या योजनांचा वाढता व्याप विचारात घेऊन वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. २.०० कोटी वरुन रु. ५.०० कोटीपर्यन्त शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक-व्हीजेडब्ल्यू १०८८/४७७९४/१२२/मावक-२, दिनांक ६.२.१९८९ अन्वये वाढविण्यांत आले. त्यानंतर धनगर व वंजारी समाजाच्या विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यांत आल्यामुळे वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळाच्या बीज भांडवल

मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्यामुळे
कर्ज योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांमध्ये
कोटीवरुन वाढवून ते रु. १०.०० कोटी पर्यंत
महामंडळाचे भाग भांडवल रु. ५.००
करण्यांस शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, क्र. वनास-
१०९४/२०२/प्र.क्र. ४४/मोवक-६, दिनांक २८ मार्च १९९५ अन्वये मंजूरी देण्यांत आली
आहे. सदर महामंडळाकडून विमुक्त जाती व भटक्या जमातीतील व्यक्तींच्या
आर्थिक उन्नतीकरीता विविध योजना राबविण्यांत येतात. त्यामुळे सध्याच्या
मंजूर भाग भांडवलात वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. आता शासन या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ [मर्यादित] चे अधिकृत भाग भांडवल रु. १०.०० कोटीवरुन रु. २०.०० कोटी [रुपये वीस कोटी] पर्यन्त वाढविण्यास मंजूरी देत आहे.

३. हा शासन निर्णय नियोजन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-५३८/साऊ, दि. २५.९.१९९६ अनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

[ ज. रा. घाणेकर ]
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ [मर्यादित] मुंबई.
स्वीय सहाय्यक, सचिव [समाजकल्याण], मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक, मंत्री [समाजकल्याण] मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक राज्यमंत्री [समाजकल्याण] मंत्रालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई
वित्त विभाग [साऊ/व्यय-११] मंत्रालय, मुंबई
[illegible] मुंबई